SNBP International & Senior Secondary School, Chikhali, Pune.
Affiliation No. 1130703
Academic session 2024-25
std.8th
NOTES-4(TERM-1)
Subject - Marathi

Prepared by: Renuka Joshi LESSON- ५.हरवलेली वेळ

- **पूर्व उपक्रम – स्वत:चा दिनक्रम लिहा.**

**शब्दार्थ.**

१. तासनतास – खूप वेळ २.आकृत्या – रचनात्मक चित्र

३. मनीचे पिल्लू – मांजरीचे पिल्लू ४. मैदान – मोकळी जागा.

**प्रश्न १. पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**१. विराजला काय बघायला आवडत असे?**

**उत्तर – विराजला सगळ्या छान –छान गोष्टी बघायला आवडायच्या.**

**२. विराजला केव्हा उशीर होत असे?**

**उत्तर – विराज शाळेसाठी तयार होऊन निघाला की रस्त्याने सगळ्याच गोष्टी बघत असे त्यामुळे त्याला शाळेत जाताना उशीर होत असे.**

**३. विराजला आई काय बघायला घेऊन जाणार होती?**

**उत्तर –विराजला आई सुंदर गुलाबाच्या फुलांचे प्रदर्शन बघायला घेऊन जाणार होती.**

**प्रश्न २.** पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.

**१.विराजचा चित्रकलेचा तास कशामुळे बुडाला ?**

**उत्तर – विराज शाळा सुटल्यावर मित्राबरोबर खेळला,मग फुलपाखराच्या मागे गेला,तळ्यातील मासे पाहिले,बागेत मोठ्या माणसांना हसताना पहात बसला म्हणून त्याचा चित्रकलेचा क्लास बुडाला.**

**२.विराज वेळ परत आणण्यासाठी कुठे कुठे गेला?**

**उत्तर – विराज वेळ परत आणण्यासाठी आधी शाळेच्या मैदानावर मग बागेत,तळ्याकाठी आणि हसणाऱ्या लोकांकडे गेला.**

**३.आईने विराजला वेळेचे महत्व कसे सांगितले?**

**उत्तर – आईने विराजला जवळ घेतले आणि हरवलेला वेळ कधीच परत मिळत नाही म्हणून आपणच तो जपून वापरायचा असतो हे समजावून सांगितले.**

प्रश्न ३. विरुद्धार्थी शब्द लिहा .

१. सुंदर x कुरूप २.बरोबर x चूक

३. वाईट x चांगले ४. शक्य x अशक्य

प्रश्न ४. वचन बदला.

१. आकृत्या – आकृती २. चित्र – चित्रे

३.मासे - मासा ४. पुस्तक – पुस्तके ५.फुलपाखरू - फुलपाखरे

**पाठानंतरचा उपक्रम – पोवाडा वर्गात सादर करणे.**

S.Teacher HOD C –O rdinator Principal